# टिळक महाराष्ट्र विद्यापीठ, पुणे

# गृहपाठ

## बी. ए. भूगोल

द्वितीय वर्ष (सत्र ३)

२०१७–१८

**प्रती : १०००**

# गृहपाठ लिहिण्यापूर्वी विद्यार्थ्यांनी पुढील सूचना वाचाव्यात व त्याप्रमाणे गृहपाठांचे काम करावे.

१. बी. ए. (विशारद) सामाजिकशास्त्रे या अभ्यासक्रमातील गृहपाठ लेखन हा महत्त्वाचा आणि अनिवार्य भाग आहे. गृहपाठ लिहिण्यापूर्वी विद्यार्थ्याने संबंधित विषयाचे पुस्तक वाचून मगच गृहपाठ लिहिणे आवश्यक आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांचा विषयाचा अभ्यास होतो. स्वयंअध्ययनाची सवय व्हावी व उत्तरपत्रिका लेखनाचा सराव व्हावा हाच गृहपाठ लेखनामागील हेतू आहे.

२. गृहपाठ लिहिताना पुस्तकातील मजकुराची केवळ नक्कल करू नये. विद्यार्थ्याने विषय समजून घेऊन गृहपाठ लिहिला आहे की नाही हे जाणीवपूर्वक पाहिले जाते आणि त्याप्रमाणे गुण दिले जातात.

३. गृहपाठ त्यांच्या अनुक्रमानुसार व सलग लिहावेत. एक गृहपाठ संपल्यावर ठळक रेघ मारून पुढील ओळीवर अथवा नव्या पानावर पुढील गृहपाठ लिहावा. उत्तरात लाल शाईचा वापर करू नये. योग्य समास सोडावा.

४. मोठ्या प्रश्नांचे उत्तर ४० ते ५० ओळीत असावे. गरजेनुसार जास्त चालेल. टीपा लिहा प्रत्येकी २०–२५ ओळीत उत्तरे असावे.

५. उत्तरात गरज नसताना १, २, ३....... असे आकडे घालण्याऐवजी योग्य परिच्छेद पाडावेत.

६. उत्तराला सुरुवात करताना प्रास्ताविक व उत्तराच्या शेवटी समारोप असेल तर ते उत्तर अधिक चांगले मानले जाते.

**७. सत्र ३ व सत्र ४ चे गृहपाठ एकत्रित दिलेले आहेत याची नोंद घ्यावी.**

८. विद्यापीठ अनुदान आयोगाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार 'क्षेत्रीय कार्य' अथवा उपक्रम हा प्रश्न घालण्यात आला आहे. त्यासाठी अवांतर वाचन व सद्यःस्थितीतील घडामोडींचे निरीक्षण आवश्यक आहे.

## गृहपाठ सादर करण्याची मुदत

| सत्र | विना विलंबशुल्क | विलंब शुल्कासह |
|---|---|---|
| तिसरे | १५ ऑक्टोबर २०१७ | ३१ ऑक्टोबर २०१७ |
| चौथे | २८ फेब्रुवारी २०१८ | १५ मार्च २०१८ |

# कृषी भूगोल (GC-301)

## सत्र ३

---

**प्र. १. भारतीय कृषी समस्या सोडविण्याचे उपाय सांगा.** **(गुण : १५)**

**उत्तर – प्रस्तावना –** देशातील ७० टक्के लोक शेतीवर अवलंबून – इतर देशांप्रमाणे शेतीचा विकास नाही – पाश्चिमात्य देशातील नवीन पद्धती ज्ञात नाही.

**मुद्दे –** १. जमिनीची धूप थांबविणे – अ) बांध घालणे ब) पायऱ्यांची शेती करणे क) पूर नियंत्रण ड) योग्य खतांचा वापर.

२. जमीन कृषीयोग्य बनविणे ३. उत्तम बी–बियाणांचा पुरवठा करणे ४. नैसर्गिक व रासायनिक खतांचा वापर करणे ५. जलसिंचनाच्या सोयी ६. शेतजमिनीचे एकत्रीकरण ७. शेतीच्या जुन्या पद्धतीत व अवजारांत बदल करणे ८. क्षारयुक्त व आमली जमिनीची सुधारणा ९. पिकांवरील रोगाचे निर्मूलन १०. शेतकी शाळा व कृषी महाविद्यालयात शेतकऱ्यांच्या मुलांना शिक्षण.

इत्यादी मुद्द्यांचे सविस्तर स्पष्टीकरण करणे आवश्यक. समारोप.

**प्र. २. कृषी भूगोलाच्या अध्ययन पद्धतीचे वर्णन करा.** **(गुण : १५)**

**उत्तर – प्रस्तावना –**

**मुद्दे –** १. अध्ययन पद्धती २. वस्तू पद्धती ३. प्रादेशिक पद्धती ४. अर्वाचीन पद्धती – प्रयोग पृथक्करण पद्धती इ. मुद्द्यांचे सविस्तर स्पष्टीकरण करणे आवश्यक. समारोप.

**प्र. ३. पुढील प्रश्नांची २५ ते ३० ओळीत उत्तरे द्या. (कोणतेही २)** **(गुण : १५)**

**१) कृषीवर परिणाम करणारे प्राकृतिक घटक स्पष्ट करा.**

**उत्तर – प्रस्तावना –**

**मुद्दे –** १. भूपृष्ठ २. हवामान ३. जमीन ४. भूमिगत पाणी इ. मुद्द्यांचे सविस्तर स्पष्टीकरण करणे आवश्यक. समारोप.

**२) भात या पिकाच्या वाढीसाठी आवश्यक असणारी परिस्थिती स्पष्ट करा.**

**उत्तर – प्रस्तावना –** भात – प्रमुख अन्न – भारतात उत्पादन – प्राचीन संस्कृतीमध्ये तांदळाचा उल्लेख.

**मुद्दे –** भाताच्या वाढीस आवश्यक असणारी परिस्थिती. १. हवामान २. तापमान ३. पर्जन्यमान ४. सूर्यप्रकाश ५. माती ६. मशागत ७. मजूर पुरवठा ८. शेतीची पद्धत. इत्यादी मुद्द्यांचे स्पष्टीकरण करणे आवश्यक. समारोप.

**३) कृषी भूगोलाचे स्वरूप स्पष्ट करा.**

**उत्तर – प्रस्तावना –**

**मुद्दे –** आर्द्रता – मृदा – पाणी – जोपासनी – दळणवळण – अर्थप्राप्ती इ. इत्यादी मुद्द्यांचे सविस्तर स्पष्टीकरण करणे आवश्यक. समारोप.

**४) शेतीचे प्रकार लिहून मागासलेली शेती प्रकार स्पष्ट करा.**

**उत्तर – प्रस्तावना –** शेतीचे प्रकार आवश्यक.

**मुद्दे –** मागासलेली शेती – अ) स्थलांतर शेती ब) स्थायिक शेती. इत्यादी मुद्द्यांचे स्पष्टीकरण आवश्यक. समारोप.

**प्र. ४. टिपा लिहा. (कोणत्याही २) (गुण : १५)**

**१) भारतीय शेतीच्या नैसर्गिक समस्या**

**उत्तर – प्रस्तावना –**

**मुद्दे –** १. भूपृष्ठरचना २. हवामान ३. जमिनीची धूप ४. क्षारयुक्त व आमली जमीन ५. नद्यांना येणारे महापूर ६. पिकांवर पडणारी कीड व रोग इत्यादी मुद्द्यांचे स्पष्टीकरण आवश्यक. समारोप.

**२) व्यापारी अन्नधान्याची शेती**

**उत्तर – प्रस्तावना –** व्याख्या देणे गरजेचे.

**मुद्दे –** १. स्थान २. हवामान ३. जमीन ४. शेतांचा आकार ५. मर्यादित मनुष्यबळाचा वापर ६. आधुनिक यंत्राचा वापर ७. बी–बियाणे ८. पिके ९. वाहतूक व्यवस्था १०. राष्ट्रीय–आंतरराष्ट्रीय बाजारपेठ. इत्यादी मुद्द्यांचे स्पष्टीकरण आवश्यक. समारोप.

**३) राष्ट्रीय धोरण**

**उत्तर – प्रस्तावना –**

**मुद्दे –** सरकारची भूमिका – शेतकऱ्यांची मानसिकता – कृषी मालाची किंमत – हरितक्रांती – भारतातील हवामान – नवीन तंत्राचा अवलंब यांचे स्पष्टीकरण करणे आवश्यक. समारोप.

**४) जलसिंचन**

**उत्तर – प्रस्तावना –**

**मुद्दे –** जलसिंचनाची साधने अ) कालवे ब) विहिरी क) तलाव इ. मुद्द्यांचे सविस्तर स्पष्टीकरण आवश्यक. समारोप.

**प्र. ५. तुमच्या भागातील कृषी समस्या लिहा व उपाय सूचवा. (गुण : २०)**

**उत्तर – प्रस्तावना –**

**मुद्दे –** १. हवामान २. जमीन ३. पाणी ४. वाहतूक ५. प्रदूषण ६. नद्यांना येणारे पूर ७. पिकांवरील रोग ८. बी–बियाणांचा पुरवठा इत्यादी मुद्द्यांचे सविस्तर स्पष्टीकरण आवश्यक. समारोप.

***

# वस्ती भूगोल (GC-302)

## सत्र ३

**प्र. १. भारतातील ग्रामीण वस्त्यांचे प्रकार स्पष्ट करा. (गुण : १५)**

**उत्तर – प्रस्तावना –** ग्रामीण वस्त्यांचे प्रकार लिहावेत.

**मुद्दे –** १. सधन ग्रामीण वस्त्या – व्याख्या – स्पष्टीकरण २. विखुरित ग्रामीण वस्त्या – व्याख्या– स्पष्टीकरण ३. संमिश्र ग्रामीण वस्त्या – व्याख्या – स्पष्टीकरण ४. खंडित ग्रामीण वस्त्या – व्याख्या – स्पष्टीकरण

वरील सर्व प्रकारांचे सविस्तर स्पष्टीकरण करणे आवश्यक. समारोप.

**प्र. २. ग्रामीण वस्ती याविषयी सविस्तर माहिती लिहा. (गुण : १५)**

**उत्तर – प्रस्तावना –** व्याख्या व वैशिष्ट्ये स्पष्ट करणे.

**मुद्दे –** ग्रामीण वस्त्यांचे प्रकार – १. रेषीय आकाराच्या वस्त्या २. आयताकृती वस्त्या ३. चौरसाकृती वस्त्या ४. त्रिकोणाकृती वस्त्या ५. लंबाकार वस्त्या ६. वर्तुळाकार वस्त्या ७. अरिय वस्त्या ८. बहुभुजाकृती वस्त्या ९. नालाकृती वस्त्या १०. द्विकेंद्रित वस्त्या ११. आकारहीन वस्त्या १२. इंग्रजी आकाराच्या वस्त्या इ. मुद्द्यांचे सविस्तर स्पष्टीकरण करणे आवश्यक. समारोप.

**प्र. ३. पुढील प्रश्नांची २५ ते ३० ओळीत उत्तरे द्या. (कोणतेही २) (गुण : १५)**

**१) ग्रामीण वस्त्यांवर परिणाम करणारे प्राकृतिक घटक स्पष्ट करा.**

**उत्तर – प्रस्तावना –**

**मुद्दे –** १. भूरचना २. भूस्तर रचना ३. जमीन/मृदा ४. हवामान ५. सूर्यप्रकाश ६. शुष्कभूमी ७. पाणीपुरवठा ८. बांधकाम सामग्री ९. अन्नपुरवठा इत्यादी मुद्द्यांचे सविस्तर स्पष्टीकरण करणे आवश्यक. समारोप.

**२) वस्ती भूगोलाचे स्वरूप व व्याप्ती स्पष्ट करा.**

**उत्तर – प्रस्तावना –** वस्ती भूगोलाची व्याख्या.

**मुद्दे –** स्वरूप–स्थल–काल यांच्या संबंधामुळे निर्मिती, वस्त्या, वसाहती यांचा अभ्यास – समूहप्रियता महत्त्वाची – वस्त्यांचा उगम – सिंधू संस्कृती – वेगवेगळ्या संस्कृती – सुरुवातीच्या काळातील वस्त्यांचे स्वरूप

व्याप्ती – प्राथमिक, सामाजिक, सांस्कृतिक गरज पूर्ण – वेगवेगळ्या प्रदेशांतील, भागांतील व्यक्तिमत्त्वे वेगवेगळी. इत्यादी मुद्द्यांचे स्पष्टीकरण करणे आवश्यक. समारोप.

**३) भारतातील ग्रामीण वस्त्यांमधील घरबांधणीसाठी वापरण्यात येणारे साहित्य यांचे सविस्तर विवेचन करा.**

**उत्तर – प्रस्तावना –** ग्रामीण वस्त्या व घर बांधणीसाठी लागणारे साहित्य याचा थोडक्यात परिचय देणे.

**मुद्दे –** १. माती २. दगड ३. लाकूड ४. गवत ५. सिमेंट व जिप्सम ६. कृषी उत्पादनातील साहित्य ७. लोहपोलाद इ. इत्यादी मुद्द्यांचे सविस्तर स्पष्टीकरण करणे आवश्यक. समारोप.

**४) वस्त्यांच्या केंद्रीकरणावर परिणाम करणारे घटक स्पष्ट करा.**

**उत्तर – प्रस्तावना –**

**मुद्दे –** १. प्राकृतिक घटक २. आर्थिक घटक ३. सामाजिक घटक ४. राजकीय घटक. इत्यादी मुद्द्यांचे स्पष्टीकरण आवश्यक. समारोप.

**प्र. ४. टिपा लिहा. (कोणत्याही २) (गुण : १५)**

**१) भारतातील नगराची वैशिष्ट्ये**

**उत्तर – प्रस्तावना –**

**मुद्दे –** १. भारतातील नगरांचा प्रदीर्घ इतिहास २. संस्कृतीचे अवशेष ३. संरक्षण घटक – किल्ले, गढी, मिनार इ. ४. नगरांची अंतररचना, स्वतंत्रविभाग ५. परकीय आक्रमणे. इत्यादी मुद्द्यांचे स्पष्टीकरण आवश्यक. समारोप.

**२) भारतातील घरांचे प्रकार**

**उत्तर – प्रस्तावना –**

**मुद्दे –** १. महाराष्ट्रातील घरे – मातीची घरे, छतासाठी कौले, सिमेंटचे पत्रे, वाडा. २. कोकणातील घरे – उतरत्या छपरांची, कौले यांचा वापर, माती, दगड यांचा वापर. ३. मध्यभारतात मातीचा वापर – छतासाठी कौले, अंगण. ४. बंगाल बिहार – यामध्ये आकाराने लहान – गवताची छपरे ५. पंजाबमध्ये कच्ची–पक्की घरे – मातीचा वापर ६. गुजरात तामिळनाडू इथे दगड मातीचा वापर. इत्यादी मुद्द्यांचे स्पष्टीकरण आवश्यक. समारोप.

**३) वस्ती भूगोलाच्या अभ्यासाचे उद्देश**

**उत्तर – प्रस्तावना –** वस्ती भूगोलाची व्याख्या

**मुद्दे –** १. स्थान, आकार, आकृतीबंध यांचा संबंध २. वस्तीची कार्ये व विकास यांचा अभ्यास ३. व्यक्तिमत्त्व व सांस्कृतिक घडामोडी यांचा अभ्यास ४. वस्ती व पर्यावरण यांच्या संबंधाचा अभ्यास ५. वस्त्यांचा विकास व ऱ्हास यांचा अभ्यास ६. अभिसरण प्रक्रियांचा अभ्यास ७. विविध निकषांनुसार केलेले वर्गीकरण यांचा अभ्यास ८. वस्ती व पर्यावरण यांचा आधुनिक काळाकरिता विचारांचा अभ्यास. इ. वरील मुद्द्यांचे सविस्तरपणे स्पष्टीकरण करणे आवश्यक. समारोप.

**४) ग्रामीण भागातील लोकांची प्राथमिक स्वरूपाच्या व्यवसायांमधील कार्ये**

**उत्तर – प्रस्तावना –**

**मुद्दे –** १. शेती २. लाकूडतोड ३. खाणकाम ४. मासेमारी ५. इतर दुय्यम कार्ये इ. मुद्द्यांचे सविस्तर स्पष्टीकरण आवश्यक. समारोप.

**प्र. ५. तुमच्या भागातील वस्त्यांवर परिणाम करणारे घटक स्पष्ट करा. (गुण : २०)**

**उत्तर – प्रस्तावना –**

**मुद्दे –** १. भूरचना २. हवामान ३. पर्जन्यमान ४. सांस्कृतिक ५. पाणीपुरवठा ६. अन्नपुरवठा ७. बांधकाम सामग्री ८. जमीन ९. आर्थिक परिस्थिती १०. वाहतूक ११. पर्यावरण. इत्यादी मुद्द्यांचे सविस्तर स्पष्टीकरण आवश्यक. समारोप.

***

# साधनसंपत्ती आणि पर्यावरण भूगोल (GC-303)

## सत्र ३

**प्र. १. लोकसंख्येच्या वितरणावर परिणाम करणारे घटक स्पष्ट करा. (गुण : १५)**

**उत्तर – प्रस्तावना –** परिणाम करणारे घटक स्पष्ट करावेत.

**मुद्दे –** १. भौगोलिक घटक – अ) स्थान ब) भूरचना क) पर्वत ड) पठारे इ) मैदाने ई) भूप्रदेशाची शास्त्रीय घडण उ) हवामान ऊ) पाणीपुरवठा ए) जंगले ऐ) मृदा–जमीन ओ) खनिजे. २) सामाजिक घटक ३) सांस्कृतिक घटक ४) आर्थिक घटक ५) ऐतिहासिक घटक ६) राजकीय घटक.

इत्यादी मुद्द्यांचे सविस्तर स्पष्टीकरण करणे आवश्यक. समारोप.

**प्र. २. जलप्रदूषणाच्या व्याख्या लिहा व जलप्रदूषणाची कारणे व परिणाम स्पष्ट करा. (गुण : १५)**

**उत्तर – प्रस्तावना –** प्रदूषणाचा अर्थ स्पष्ट करणे.

**मुद्दे – कारणे –**१. सांडपाणी २. मैलापाणी नदीत सोडणे ३. कारखान्यातील दूषिते ४. इंधनगळती, घनरूप पदार्थाची गळती ५. गाळाचे अतिसंचयन ६. सेंद्रिय द्रव्याचे कुजणे ७. मानवी क्रियामुळे जलप्रदूषण. परिणाम – १. मानवी आरोग्यावरील परिणाम २. विविध रोगांचा प्रसार ३. वनस्पतीवरील परिणाम – अ) शैवाल व जलपर्णी ब) पिकांची वाढ खुंटते क) प्रकाश संश्लेषणावर परिणाम. ४. जलप्रदूषणाचे प्राण्यांवरील परिणाम. इत्यादी मुद्द्यांचे सविस्तर स्पष्टीकरण करणे आवश्यक. समारोप.

**प्र. ३. पुढील प्रश्नांची २५ ते ३० ओळीत उत्तरे द्या. (कोणतेही २) (गुण : १५)**

**१) साधनसंपत्तीची व्याख्या लिहून अर्थ व स्वरूप स्पष्ट करा.**

**उत्तर – प्रस्तावना –** साधन संपत्तीची व्याख्या देणे.

**मुद्दे –** १. साधनसंपत्तीचा अर्थ २. साधनसंपत्तीचे स्वरूप इ. मुद्द्यांचे सविस्तर स्पष्टीकरण करणे आवश्यक. समारोप.

**२) जंगलसंपत्तीचे अप्रत्यक्ष फायदे सांगा.**

**उत्तर – प्रस्तावना –**

**मुद्दे –** १. पर्यावरण समतोल २. जलसंवर्धन ३. पर्जन्यमान वाढ ४. हवामान ५. आर्द्रतेत वाढ ६. धूपनियंत्रण ७. मृदा संपन्नतेत वाढ ८. वादळी वाऱ्यापासून संरक्षण ९. प्रदूषण नियंत्रण १०. पशू–पक्षी संरक्षण इ. मुद्द्यांचे सविस्तर स्पष्टीकरण करणे आवश्यक. समारोप.

**३) दगडी कोळशाचे उपयोग सांगून एक शक्तिसाधन म्हणून महत्त्व कमी होण्याची कारणे सांगा.**

**उत्तर – प्रस्तावना –** एक शक्तिसाधन म्हणून दगडी कोळसा महत्त्वाचा – औद्योगिकीकरणास सर्वप्रथम चालना – महत्त्वाचे ऊर्जासाधन – औद्योगिक विकासात महत्त्वाचे योगदान.

**मुद्दे –** रेल्वे, जहाज, यंत्रे चालवताना – औष्णिक विद्युत निर्मितीसाठी – डांबर, रसायने, रंग निर्मितीसाठी. महत्त्व कमी होण्याची कारणे. १. कोळशाची इंधन क्षमता कमी २. कोळसा क्षेत्रांचे खंडातर्गत स्थान

३. कोळसा खाणीची उत्पादन क्षमता ४. पर्यायी शक्तिसाधने ५. वाहतूक ६. शक्ती निर्मितीक्षमता ७. अस्वच्छता ८. कोळसा उत्पादन खर्च. इ. इत्यादी मुद्द्यांचे सविस्तर स्पष्टीकरण करणे आवश्यक. समारोप.

**४) पर्यावरण अभ्यासाचे महत्त्व स्पष्ट करा.**

**उत्तर – प्रस्तावना –** पर्यावरणाची व्याख्या.

**मुद्दे –** १. पर्यावरणातील शिक्षण संधी २. पर्यावरण शास्त्राशी संबंधित रोजगार संधी ३. पर्यावरणीय संशोधन क्षेत्रे ४. जनजागृतीची आवश्यकता. इत्यादी मुद्द्यांचे स्पष्टीकरण आवश्यक. समारोप.

**प्र. ४. टिपा लिहा. (कोणत्याही २)** **(गुण : १५)**

**१) पवन उर्जेचे महत्त्व**

**उत्तर – प्रस्तावना –** पवनऊर्जेची व्याख्या

**मुद्दे –** १. एक स्वच्छ ऊर्जा प्रकार २. पवन ऊर्जा निसर्गात सर्वत्र उपलब्ध ३. एक अक्षय प्रकार ४. पवनऊर्जा निर्मिती करणारी यंत्रे आधुनिक व कार्यक्षम ५. मोठ्या विस्तृत जागेचे बंधन नाही ६. उभारणी व देखभाल खर्च कमी ७. जास्त आयुष्य. इत्यादी मुद्द्यांचे स्पष्टीकरण आवश्यक. समारोप.

**२) हवाप्रदूषणाची कारणे**

**उत्तर – प्रस्तावना –** हवा प्रदूषणाची व्याख्या.

**मुद्दे –** १. नैसर्गिक घटक – अ) जंगलातील वणवे ब) भूकंप क) ज्वालामुखीचा उद्रेक ड) जैविक विघटन इ) समुद्रजलातील क्षार बाष्पीभवन. २. मानवनिर्मित घटक – अ) वाहतूक प्रदूषण ब) किरणोत्सारी अणुस्फोट क) औद्योगिकीकरण ड) युद्धातील शस्त्रास्त्रे. इत्यादी मुद्द्यांचे स्पष्टीकरण आवश्यक. समारोप.

**३) मानवी गुणवत्ता – एक संपदा**

**उत्तर – प्रस्तावना –**

**मुद्दे –** १. लिंग रचनेनुसार विभागणी २. वयोगटानुसार रचना ३. कार्यकारी लोकसंख्येचे प्रमाण इ. मुद्द्यांचे स्पष्टीकरण करणे आवश्यक. समारोप.

**४) मौसमी अरण्यांची वैशिष्ट्ये व व्यापारी महत्त्व**

**उत्तर – प्रस्तावना –** मौसमी अरण्ये व व्यापारी संबंध थोडक्यात स्पष्ट करावा.

**मुद्दे –** मौसमी अरण्याची वैशिष्ट्ये. १. अत्यंत कठीण लाकूड २. औषधी वनस्पती ३. आर्थिक दृष्टीने महत्त्वाची ४. कच्चा माल म्हणून वापर ५. इतर विविध उपयोग.

**व्यापारी महत्त्व :** आंतरराष्ट्रीय बाजारपेठेत मागणी – विविध कामांमध्ये उपयोग – त्यामुळे वाढती मागणी तेल, औषधी, शिल्पाकृती यांसाठी मोठ्या प्रमाणात वापर. सर्व मिळणारी उत्पादने व्यापारीदृष्ट्या मौल्यवान – परकीय चलन निर्मिती. इ. मुद्द्यांचे सविस्तर स्पष्टीकरण आवश्यक. समारोप.

**प्र. ५. तुमच्या भागातील जलप्रदूषणाची कारणे व परिणाम स्पष्ट करा.** **(गुण : २०)**

**उत्तर – प्रस्तावना –** जलप्रदूषणाची व्याख्या.

**मुद्दे –** १. सांडपाणी २. कारखान्यातील दूषितके ३. गाळाचे संचयन ४. मानवी क्रिया ५. सेंद्रिय द्रव्यांचे कुजणे. परिणाम : १. मानवी आरोग्यावरील परिणाम २. विविध रोगांचा प्रसार ३. वनस्पतीवरील परिणाम ४. प्राण्यांवरील परिणाम ५. जमिनीवरील परिणाम. इत्यादी मुद्द्यांचे सविस्तर स्पष्टीकरण आवश्यक. समारोप.

***